नि.दि.दा.क्र. १४७/२०१४
प्रशांत विरुध्द हणुमंत
नि.क्र.५३ पुढे सुरु.

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची पुढील सरतपासणी शपथेवर सुरु. वादीतर्फे विधिज्ञ श्री.एन.एम.वाडीकर</u>** -

मी प्रस्तुत प्रकरणाचे कामी माझे साक्ष शपथपत्र दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगण्यानुसार माझ्या विधिज्ञांनी संगणकीकृत केलेला आहे व तो बरोबर आहे.

२. आता मला दस्त यादी निशाणी ४ सह दाखल दिनांक २/५/१९९७ रोजीचे मूळ साठेखत दाखवण्यात आले. सदरचे साठेखत रघुनाथ पोळ यांनी दावा मिळकतीबाबत वादी प्रशांत रायते यांच्या लाभात करुन दिलेले आहे. मी त्या दस्ताच्या वेळी हजर होते. त्यावर त्या दोघांनीही साक्षीदार समक्ष सहया केल्या आहेत. त्याप्रमाणे त्याच दिवशी दावा मिळकतीची कब्जेपावती करण्यात आली होती ती मला आता दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यावर रघुनाथ पोळ व हणमंत पोळ यांच्या सहया आहेत. तसेच त्यावर साक्षीदारांच्या देखील सहया आहेत. त्या दस्ताच्या वेळी देखील मी हजर होते.

३. आता मला दि. १९/६/२०१४ रोजीचे नोटीस उत्तराची स्थळप्रत दाखवण्यात आली त्यावर माझे विधीज्ञ श्री वाडीकर यांची सही असून त्यातील मजकूर आम्हा वादींच्या सांगण्यानुसार तयार केलेला असून तो बरोबर आहे. ती स्थळप्रत निशाणी क्र. ५९ देण्यात येते. त्याबाबतची पोस्टाची पोच पावती निशाणी क्र ६० वर आहे. आता मला वादी क्र १ यांनी मला करुन दिलेले मुखत्यापत्र दाखवण्यात आले. ते तेच असून त्यावर माझी तसेच वादी क्र १ यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदरील मुखत्यारपत्रास पूर्वीच निशाणी ५६ देण्यात आले आहे.

सरतपास पूर्ण
<u>**उलटतपास** प्रति**वादी तर्फे** विधीज्ञ श्री.डी.एस. शिंदे.</u>

४. हे म्हणणे खरे आहे की, मी धोम येथे राहत नसून माझी तेथे कोणतीही शेत मिळकत नाही. आता मला माझे साक्ष शपथ पत्रातील माझा पत्ता नमूद असलेला मजकूर दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यात मी मौजे धोम येथे राहते असे चुकीचे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि १८/६/२०१४ पूर्वी कधीही मी वादी प्रशांत रायते यांच्याकडुन मुखत्यारपत्र घेतलेले नव्हते.

५. मी दावा मिळकतीत कधीही गेले नव्हते. साक्षीदार पुन्हाहून सांगते की, मी तेथे काम करायला गेले नव्हते कारण मी गुजरात येथे रहायचे. हे म्हणणे खरे आहे की, दावा

मिळकतीच्या चतु:सिमा मला सांगता येणार नाही. दि २१/३/१९९७ रोजी दावा मिळकतीच्या वीस गुंठे क्षेत्राबाबत पन्नास रुपयाच्या स्टॅम्पवर रघुनाथ महादेव पोळ यांनी माझे पती मंगलसिंग रायते यांच्या लाभात करुन दिलेल्या साठेखताबाबत मला माहिती आहे. साक्षीदार सांगते की, मी त्या व्यवहाराच्या वेळी हजर देखील होते. त्यामुळे त्या साठेखतात काय लिहले गेले होते याबाबतची माहिती देखील मला होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा व्यवहार वीस गुंठे क्षेत्राकरीता होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यात नमूद रक्कम रुपये चाळीस हजार आम्ही रघुनाथ यांना एकरकमी दिली नव्हती. त्याद्वारे वीस गुंठे क्षेत्राचा ताबा सुध्दा माझ्या पतीस देण्यात आला होता.आता मला निशाणी क्र ३२ वरील कैफियत दाखवण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, त्या कैफियत सह दाखल असलेल्या नकाशामध्ये दर्शविण्यात आलेले गट क्र १२४९ मधील एकूण पंच्याऐंशी आर क्षेत्रापैकी तीस गुंठे क्षेत्र वादातील आहे. त्या साठेखतात त्या क्षेत्राची पूर्व पश्चीम लांबी रुंदी वीस आर असे लिहील्याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दस्ताद्वारे देण्यात आलेल्या क्षेत्राचा ताबा आजही आमच्याकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक १२४९ मधील वीस गुंठे क्षेत्राच्या उत्तर दक्षीण असलेले उर्वरीत क्षेत्र मयत रघुनाथ व त्यांच्या कुटुंबियांकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या ताब्यात जे क्षेत्र आहे त्याची मोजणी आजपर्यंत करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आमच्या ताब्यात नेमके किती क्षेत्र आहे हे मला सांगता येणार नाही.

**<u>प्रकरण पुढील उलटतपासाकरिता तहकूब.</u>**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

वाई.
दि.११.०४.२०२५

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.04.11 17:37:52 +0530

(आर.एम. भेंडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.